# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२१९ दिनांक-०६/०६/२०२४

## दिवसा घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास भाईंदर पोलीस ठाणेकडून अटक

भाईंदर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा रजि क्र – १६८/२०२४ भा.द.वि.स. कलम- ३८०, ४५४ प्रमाणे गुन्हा नोंद असुन गुन्हयाची हकीगत अशी की, दि. २४/०४/२०२४ रोजी सकाळी ११.३० ते १२.४५ वाजेदरम्यान फिर्यादी हया मुलीसह हॉस्पीटल ला गेल्या असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी याचे घराचे मधला दरवाजा तोडून घरात प्रवेश करुन घरातील उघडया लाकडी कपाटातुन १,९०,००० रुपये किं.चे सोन्याचे कानातले आणि सोन्याचे मंगळसुत्र असे चोरुन नेले आहेत म्हणून अज्ञात चोरटयाविरुध्द तक्रार दिल्याने सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा हा दिवसा घरफोडीचा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सुरु करण्यात आला होता. तपासा दरम्यान गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देवुन गुन्हयाच्या घटनास्थळाचे, तसेच घटनास्थळाकडे येणाऱ्या-जाणाऱ्या रस्त्याचे उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासले असता, त्यात एक संशयित इसम मिरा भाईंदर महानगरपालिकाचे सफाई कामगाराचे कपडे घातलेला दिसुन आला. पण सीसीटीव्ही कॅमेराचे फुटेज व्यवस्थित नसल्याने संथयित आरोपीबाबत उपयुक्त माहीती मिळून आली नाही. उपलब्ध सीसीटिव्ही फुटेज पुन्हा चेक केले असता एका सीसीटिव्ही फुटेज मध्ये आरोपीचे चेहरा नीट दिसुन आल्याने सदर उपलब्ध फोटो मिरा रोड, भाईंदर, काशिमिरा येथे मिरा भाईदर महानगरपालिका सफाई कामगार यांचे मुकादम यांना दाखविला असता संथयित आरोपी याचे नाव अजय अनंत पाटिल असे निष्पन्न झाल्याने आरोपीतास सिल्वर पार्क मिरा रोड येथून ताब्यात घेवून आरोपीकडे चौकशी केली असता आरोपीचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न झाला असुन आरोपीतकुडुन एकूण १,४४,००० /- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात भाईंदर पोलीस गुन्हे प्रकटीकरण कक्षास यश आले आहे. आरोपी हा सध्या पोलिस कोठडीत आहे.

आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) केळवा सागरी पोलिस ठाणे गुरनं १३/२०२१ भादवि कलम ३८०, ४५४, ४५७
२) केळवा सागरी पोलिस ठाणे गुरनं १७/२०२१ भादवि कलम ३८०, ४५४, ४५७
३) केळवा सागरी पोलिस ठाणे गुरनं ४५/२०२१ भादवि कलम ३८०, ४५७
४) केळवा सागरी पोलिस ठाणे गुरनं ५५/२०२१ भादवि कलम ३८०,४५४, ४५७
५) सफाळा पोलिस ठाणे गुरनं ४१/२०२२ भादवि कलम ३८०
६) सफाळा पोलिस ठाणे गुरनं ८०/२०२१ भादवि कलम ३८०, ४५४, ४५७
७) सफाळा पोलिस ठाणे गुरनं ०८/२०२२ भादवि कलम ३८०, ४५४, ४५७

सदरची कामगिरी श्री.प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, दिपाली खन्ना, सहा.पो.आयुक्त, भाईंदर विभाग, सुर्यकांत नाईकवाडी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भाईंदर पोलीस ठाणे, विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री माणिकराव कतुरे, पोउनि/प्रसाद गोवले, पोहवा-०६२९७/रविंद्र भालेराव, पोहवा-०७१२०/राजेश श्रीवास्तव, पोहवा-०७१४५/किरण पी. पवार, पोहवा-०९००४/ किरण आर. पवार, पोहवा-१२१३९/सुशिल पवार, पोना-९७०१०/रामनाथ शिंदे, पोशि-१००३८/संजय चव्हाण, पोशि-१२१२३/सलमान पटवे पोहवा/०००२० जयप्रकाश जाधव नेम परिमंडळ १ कार्यालय यांनी केलेली आहे.


मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
भाईंदर पोलीस ठाणे
Ph.: 022/8192257
Mob.: 8657936951
महाराष्ट्र पोलीस
BHAYANDAR ARTS

**----0000----**